**प्रकल्प प्रवर्तक मे. लॉयड्स मेटल्स एण्ड एनर्जी लिमिटेड यांच्या सूरजागड आयर्न ओअर माईन, सुरजागड, तालुका-एटापल्ली, जिल्हा-गडचिरोली, महाराष्ट्र या कार्यरत प्रकल्पात क्रशिंग आणि स्क्रिनिंग प्रकल्पासह आयर्न ओअर (Iron Ore) ची उत्पादन क्षमता ३.० दशलक्ष प्रति वर्ष ते १०.० दशलक्ष प्रति वर्ष ३४८.०९ हेक्टर क्षेत्रात विस्तार करण्याच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत -**

---

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | २७/१०/२०२२ |
| वेळ | : | दुपारी १२:०० वाजता |
| स्थळ | : | प्रकल्प स्थळ, नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय गडचिरोली, ता. जि. गडचिरोली. |

**<u>प्रस्तावना:-</u>**

प्रकल्प प्रवर्तक मे. लॉयड्स मेटल्स एण्ड एनर्जी लिमिटेड यांच्या सूरजागड आयर्न ओअर माईन, सुरजागड, ता. एटापल्ली, जि. गडचिरोली, महाराष्ट्र या कार्यरत प्रकल्पात क्रशिंग आणि स्क्रिनिंग प्रकल्पासह आयर्न ओअर (Iron Ore) ची उत्पादन क्षमता ३.० दशलक्ष प्रति वर्ष ते १०.० दशलक्ष प्रति वर्ष ३४८.०९ हेक्टर क्षेत्रात विस्तार करण्याच्या पर्यावरणविषयक प्रस्तावाबाबत प्रकल्प प्रवर्तकांना पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेला पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (EIA) तयार करण्यासाठी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी टीओआर दिनांक १८ जुलै, २०२२ रोजी मान्यता दिलेली आहे.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण जाहिर जनसुनावणी आयोजित करणे व त्यात प्रकल्पग्रस्त, स्थानिक लोक यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित केलेले पर्यावरणीय मुद्दे अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात समाविष्ट करण्याचे निर्देश दिले. तसेच सदरहू प्रकल्प हा संवर्ग ए शेड्युल १ (ए) (आय) मध्ये मोडत असून पर्यावरण अनुमती ही पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडून प्राप्त करणे आवश्यक आहे.

प्रकल्प प्रवर्तक मे. लॉयड्स मेटल्स एण्ड एनर्जी लिमिटेड यांच्या सूरजागड आयर्न ओअर माईन, सुरजागड, तालुका-एटापल्ली, जिल्हा-गडचिरोली, महाराष्ट्र या कार्यरत प्रकल्पात क्रशिंग आणि स्क्रिनिंग प्रकल्पासह आयर्न ओअर (Iron Ore) ची उत्पादन क्षमता ३.० दशलक्ष प्रति वर्ष ते १०.० दशलक्ष प्रति वर्ष ३४८.०९ हेक्टर क्षेत्रात विस्तार करण्याच्या पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दिनांक २८/०७/२०२२ रोजी अर्ज सादर केला. म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर व जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्या समन्वयाने जिल्हाधिकारी गडचिरोली, महाराष्ट्र राज्य यांनी गुरुवार, दिनांक २७ ऑक्टोबर, २०२२ रोजी दुपारी १२:०० वाजता

प्रत्यक्ष (physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय-गडचिरोली, ता. जि. गडचिरोली, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यास मान्यता दिली.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठकीच्या ३० दिवस अगोदर जाहिर जनसुनावणीची सूचना एक स्थानिक वृत्तपत्रात स्थानिक भाषेत व एक राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजीमध्ये प्रकाशित करणे बंधनकारक असल्याने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर यांनी स्थानिक वृत्तपत्र लोकमत यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र टाइम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत दिनांक २३/०९/२०२२ रोजी जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात नियोजित प्रकल्पामुळे परिसरातील रहिवाशी, पर्यावरणविषयक कार्यरत संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक, विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून जनसुनावणीच्या तारखेपर्यंत स्थानिक चंद्रपूर कार्यालयात लेखी वा ईमेलव्दारे सादर करण्याचे आवाहन करण्यात आलेले होते. त्यानुसार उप प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर यांना ३७ लेखी आक्षेप प्राप्त झालेले आहे.

या प्रकल्पाबाबत तयार करण्यात आलेला प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल इंग्रजी व मराठीत खालील अधिसूचित कार्यालयात नागरिकांच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता:-

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिएल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर

२) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, १५वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

३) सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, 3रा माळा, पीव्हीआर सिनेमागृहासमोर, सायन सर्कलजवळ, सायन पूर्व, मुंबई- ४०० ०२२.

४) प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रस्ता, चंद्रपूर,

५) उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रस्ता, चंद्रपूर

६) जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली,

७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली,

८) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, गडचिरोली,

९) उप विभागीय अधिकारी, उप विभागीय कार्यालय, एटापल्ली, ता. एटापल्ली, जि. गडचिरोली,

१०) मुख्य अधिकारी, नगर पंचायत, एटापल्ली, ता. एटापल्ली, जि. गडचिरोली,

११) तहसीलदार, तहसील कार्यालय एटापल्ली, ता. एटापल्ली, जि. गडचिरोली,

१२) पंचायत समिती कार्यालय, एटापल्ली, ता. एटापल्ली, जि. गडचिरोली.

१३) गट ग्रामपंचायत कार्यालय, पुरसाळगोंडी तालुक्यातील बांडे, मल्लमपड (मत्यमपड), मांगेर, परसाळगोंडी, सुरजागड, हेड्री, ता. एट्टापल्ली, जि. गडचिरोली

१४) गट ग्रामपंचायत कार्यालय, तोडसा (इकारा खुर्द) (अकेराटोला), करनपल्ली, पेठा (खुर्द), झारेगुडा (झारेवाडा), ता. एटापल्ली, जि. गडचिरोली,

१५) गट ग्रामपंचायत कार्यालय, नागुलवाडी (कुदारी) (कुट्री), नागुलवाडी (नागुलपाडी), मोहली (मोली), ता. एटापल्ली, जि. गडचिरोली,

वरिल अनुक्रमांक ०६ ते १५ वर नमुद अधिसुचित शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर सदरहू पर्यावरणविषयक जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. अशा प्रकारे जाहिर जनसुनावणीबाबत अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात आली, जेणेकरुन प्रकल्पबाधित किंवा संबंधित व्यक्तींना त्यांचे विचार, टीकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप संबंधित विभागास नोंदविणे सोईचे होईल.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश ई-७६/२०२२ व्दारा पत्र क्रं. बीओ/जेडी (डबल्युपीसी) पीएच/बी-२२०९३०-एफटीएस-०१७७ दिनांक ३०/०९/२०२२ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केलीः-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, गडचिरोली<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई<br>यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | - | **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>चंद्रपूर | - | **समन्वयक** |

या कार्यालयास उपरोक्त प्रकल्पाबाबत ३७ सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप प्राप्त झालेले असून संबंधित व्यक्ती/संस्था यांना जनसुनावणीस उपस्थित राहून त्यांच्या सूचना सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप उपस्थित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जनसुनावणी दरम्यान उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहिर जनसुनावणी घेण्यासाठी गठित केलेल्या समितीचा आदेश सहपत्र-२ प्रमाणे सोबत जोडलेले आहेत.

**<u>जनसुनावणीचे इतिवृत्तः-</u>**

जनसुनावणीच्या सुरवातीस श्री अतुल सातफळे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. चंद्रपूर तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री संजय मीना,भाप्रसे,जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, गडचिरोली जिल्हा, श्री धनाजी पाटील, अपर जिल्हादंडाधिकारी, गडचिरोली तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री अ. मा. करे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. चंद्रपूर तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्पाचे अधिकारी, पर्यावरण क्षेत्रातील कार्यरत विविध संस्था व मोठया संख्येने उपस्थित स्थानिक यांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहिती दिली. त्यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक सूचना, विचार, आक्षेप उपस्थित करण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की सदरहू जनसुनावणी ही स्थानिक, प्रकल्पग्रस्त यांच्यासाठीच आयोजित करण्यात आलेली असून, जेणेकरून पर्यावरणविषयक प्रश्न, शंका यांचे निरसन होईल.

समन्वयक यांनी सांगितले की सदरहू समिती ही उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, नाकारणे वा शिफारस करण्याचा अधिकार नाही. बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

त्यांनी सांगितले की अधिसूचनेतील तरतुदींनुसार सदरहू बैठकीचे छायाचित्रिकरण व व्हिडीओ शुटींग करण्यात येत असून सादरीकरणानंतर उपस्थितांना आपले प्रश्न, सूचना, विचार, आक्षेप शांतपणे मांडावेत. त्यास प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार किंवा प्रकल्प प्रवर्तक उत्तर देतील. प्रश्न विचारताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्यात यावे.

आयोजक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण करण्याची सूचना केली.

प्रकल्प अधिकारी यांनी प्रकल्पाचे विस्तारिकरण व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण मराठी भाषेत केले. सादरीकरणात प्रामुख्याने खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्याः-

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, अक्षांश-रेखांश,नकाशा, बुडित क्षेत्र, लाभक्षेत्र, वन क्षेत्र,प्रकल्पाचे वैशिष्ट्ये,प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमीन वापर, भूकंप स्थिरता,
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधि, शेतक-यांच्या प्रकल्पामुळे होणारा विकास,

- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषण
- हवा, पाणी, जमीन, ध्वनी, विस्थापन इ.बाबतची माहिती,
- नियोजित प्रकल्पामुळे हवा,पाणी,विस्थापन,जैवविविधता यावर होणारे परिणाम व व्यवस्थापन
- प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहिती
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहिती

आयोजक यांनी उपस्थितांना त्यांचे प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पाविषयी काही विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. सदरहू जनसुनावणी ही पर्यावरणविषयक असल्याने पर्यावरणविषयकच प्रश्न उपस्थित करण्याची व सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्याची सूचना केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीत सांगितले की जे काही लेखी निवेदने/आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत, ते शासनास पाठविण्यात येतील. त्याचप्रमाणे उपस्थितांपैकी कोणाला जर फक्त लेखी निवेदन/आक्षेप नोंदवायचा असेल, तर ते म.प्र.नि.मंडळाच्या प्रतिनिधीस हस्तांतरित करु शकतात. त्याची पोच देण्यात येईल. त्याचे लेखी उत्तर प्रकल्प प्रवर्तकांना संबंधित व्यक्तीस पाठविण्याची सूचना करण्यात आलेली आहे

**<u>जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीकाटिप्पणी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार/ पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने खालीलप्रमाणे:-</u>**

**१) <u>मिस इलिग्रेश हूरकेत्ता, राहणार-मंगेर, तालुका-एटापल्ली,जिल्हा-गडचिरोली:-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी मंगेरमध्ये राहते. माझ्या गावात पहाडी आहे. पहाडीचे पाणी आमच्या शेतात जात आहे. त्या शेतासाठी काहीना काही केले पाहिजे. जे बी रुजविण्यासाठी टाकतो, ते रुजत नाही. त्या मातीने ते बुजत आहे. त्यातून आम्हाला त्रास होत आहे. बैल, बकरी यांनाही पाणी पिण्याचा त्रास होत आहे. आम्ही रिमोट भागामध्ये आहोत. आमच्या मुलांचे शिक्षण व्हायला पाहिजे. माझी मुले शिकून या प्रकल्पात कामाला लागली पाहिजे. आमचे मुलांना | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांची नोंद घेण्यात आलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | शिकवावे, ट्रेनिंग देऊन प्रकल्प त कामास लागावे. गावात दवाखाना झाला पाहिजे. शाळा पाहिजे. तेथे मुले शिकली पाहिजे. शिकून सामोरे गेले पाहिजे. कोनसरी प्रकल्पात आहे, तेथेही रोजगार मिळाला पाहिजे. | |

२) <u>**श्री मंगेशकुमार पुंगाटी, ग्रामपंचायत-नागुलवाडी मौजे कुद्री, ता. एटापल्ली, जि. गडचिरोली:-**</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्पात बाधित क्षेत्रातील शिक्षित, अशिक्षित युवक युवतींना रोजगाराची संधि देण्यात यावी. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले प्रकल्पात स्थानिक व प्रकल्प बाधितांना रोजगाराची संधि देण्यात येईल. |
| २) | आयटीआय सारखे उच्चशिक्षित प्रशिक्षण मोफत देण्यात यावे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ३) | शासकीय अधिसूचनेनुसार सीएसआर निधी हा ग्रामपंचायत क्षेत्रात खर्च करण्यात यावा, त्यामुळे ग्रामविकासास मदत होईल. | अधिसूचनेनुसार सीएसआर निधी खर्च करण्यात आलेला आहे. |
| ४) | कष्टक-यांना वनजमिनीत कायमचे पट्टे देण्यात यावे. प्रलंबित नवीन वनजमीनीवर अतिक्रमणधारकास मालकी हक्काचे कायमस्वरुपी पट्टे देण्यात यावे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ५) | खनिज उत्पादनात खाणीतून खनिजयुक्त गढूळ पाणी येते. ते शेतीला नुकसान करणारे असल्यने त्याचा बंदोबस्त करण्यात यावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की शेतीचे नुकसान न होण्यासाठी सर्व उपाययोजना करण्यात येतील. |
| ६) | सदरची गावे नदीकाठी असून पुरापासून धोका असल्याने कंपनीने बंधार बांधून पाणी अडवणे व रस्ता बांधू नये. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ७) | भविष्यात खनिज उत्खनन भूसुरुंगामुळे प्रदूषण निर्माण होऊन गावे विस्तापित होण्याची शक्यता १००% नाकारता येत नाही. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ८) | कुटुंबाच्या नावे असलेली संपूर्ण मालमत्ता जमिन वा इतर संसाधने याची पुर्णतः भरपाई करुन पुनर्वसन मूलभूत सोयीसुविधा पुरविणे याची जबाबदारी शासनाची राहिल, संपुर्ण सोयीसुविधा पुरवूनच पुनर्वसन करण्यात यावे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| ९) | नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्याधुनिक आरोग्यसेवा व सुविधा पुरविण्यात याव्यात | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| १०) | शाळाबाहेर असलेल्या मुलांमुलीसाठी शाळा व शिक्षकांची सोय करुन देण्यात यावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ११) | कंपनीने आपल्या सीमेच्या व्यतिरिक्त काम करु नये आणि सीमेची मर्यादा ओलांडू नये. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

**३) <u>श्री सौरभ कवडू, ग्रामपंचायत-पुरसलगुंडी, ता. एटापल्ली, जि. गडचिरोली:-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | हा जो प्रकल्प विस्तार होणार आहे, येथे स्थानिक बेरोजगार मुले, लोक आहेत. त्यांना रोजगार मिळाला पाहिजे. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की प्रकल्पात 90% रोजगार हा स्थानिकांनाच देण्यात येणार आहे. |
| २) | तसेच स्थानिक मुलांना शिकण्यासाठी इंग्रजी माध्यमाची शाळेची गरज आहे. ती पूर्ण करावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ३) | गावातील लोकांसाठी सर्व सुविधा असलेले २४ तास चालणारे सरकारी हॉस्पिटल त्वरित चालू करावे. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की सर्व बाधित गावांच्यामधील केंद्र बिंदू (Centre Point) ठरवून तेथे अद्ययावत हॉस्पिटल बांधण्यात येईल. |

**४) <u>श्री रोहित बाबूराव धडबे, गाव-सुरजागड, तालुका-एटापल्ली,जिल्हा-गडचिरोली:-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सुरजागड प्रकल्पात बाधित गावे आहेत. त्या गावातील लोक रोजगारवंचित आहेत. तरी त्या गावातील लोकांना रोजगार मिळावा. | प्रकल्प बाधित गावातील लोकांना रोजगाराची संधि देण्यात येईल. |
| २) | आमच्या क्षेत्रात इंग्लिश माध्यमाची पहिली ते बारावीपर्यंत शाळा पाहिजे. आमच्या गावात अद्ययावत हॉस्पीटल पाहिजे. ते २४ तास असावे. जाण्या-येण्यासाठी चांगले रस्ते पाहिजे. मुलांना राहण्यासाठी वसतीगृह (hostel) त्वरित बांधण्यात यावे. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की सर्व बाधित गावांच्यामधील केंद्र बिंदू (Centre Point) ठरवून तेथे शाळा बांधण्यात येईल. त्याचप्रमाणे वसतिगृहांबाबत निश्चितच सकारात्मक निर्णय घेण्यात येईल. |

**५) <u>श्री अंकुश गावडे, राहणार मोहर्ली, ग्रामपंचायत नागुलवाडी, जिल्हा-गडचिरोली:-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे होत आहेत. तरीसुध्दा माझ्या गावात वीज नाही, वैदकीय सुविधा नाहीत. पावसाळ्यात वैदकीय सुविधा मिळण्यासाठी खूपच त्रास होतो. तरी गावात अद्ययावत ह़ॉस्पीटल बांधण्यात यावे. गावात रुग्णवाहिका येऊ शकत नाही, कारण गावातील नदीवर पूल नाही. त्यासाठी पूल बांधण्यात यावा. | सूचनेची नोंद घेण्यात आली. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की सर्व बाधित गावांच्यामधील केंद्र बिंदू (Centre Point) ठरवून तेथे हॉस्पिटल बांधण्यात येईल. |
| २) | त्याचप्रमाणे मायनिंग फंडातील रक्कम गावातील विकासासाठी खर्च करण्यात यावा. शेतीसाठी सर्व शेतकऱ्यांना सोलर ऊर्जा पुरविण्यात यावी. ग्रामपंचायतींचा लोकांना रोजगाराची संधि प्रकल्पात देण्यात यावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

६) **<u>सौ. मीता मंगेश मटाली, राहणार-बांडे, तालुका एटापल्ली, जिल्हा-गडचिरोली:-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्पात महिलांना रोजगार मिळाला पाहिजे. गावात पहिली ते बारावी कॉन्व्हेंट शाळेची गरज आहे. ती त्वरित सुरु करावी. गावात अद्ययावत हॉस्पिटल बांधण्यात यावे. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की सर्व बाधित गावांच्यामधील केंद्र बिंदू (Centre Point) ठरवून तेथे हॉस्पिटल बांधण्यात येईल. |
| २) | गावातील मुला-मुलींना प्रशिक्षण (training) देऊन प्रकल्पात रोजगाराची संधि देण्यात यावी. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की याबाबत निश्चितच सकारात्मक निर्णय घेण्यात येईल. |

येथे, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की रोजगार, रस्ता, दवाखाना, शाळा याबाबत सर्वांनीच मागण्या केलेल्या आहेत. सदरहू बैठक ही प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक बाबींविषयी आहे. तरी उपस्थितांना आवाहन करण्यात येते की त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक काही सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी असल्यास त्या उपस्थित करण्यात याव्यात.

७) **<u>श्री नामसू करवे मराठे, नागुलवाडी ग्रामपंचायत सदस्य, ता. एटापल्ली, जि. गडचिरोली:-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आम्हांला रोजगार पाहिजे. त्याचप्रमाणे गावातील लोकांना मोफत औषधोपचार पाहिजे. | प्रकल्पात स्थानिकांनाच रोजगारी संधि देण्यात येईल. |

८) **<u>ललिता ईचामी, नानाग्रड्री, कुसुब ग्रामपंचायत, ता. एटापल्ली, जि. गडचिरोली:-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | गावातील पुरुष स्त्रियांना प्रकल्पात रोजगार देण्यात यावा. गावातील रस्ता चांगला करा. गावात इंग्रजी माध्यमाची शाळा चालू करण्यात यावी. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की सर्व बाधित गावांच्यामधील केंद्र बिंदू (Centre Point) ठरवून तेथे हॉस्पिटल बांधण्यात येईल. त्याचप्रमाणे इंग्रजी माध्यमाची शाळा चालू करण्यात |
| २) | गावातील लोकांच्या आरोग्यासाछी एक सरकारी दवाखाना त्वरित चालू करण्यात यावा. | सूचनेची नोंद घेण्यात आलेली असून जिल्हाधिकारी कार्यालयात सदरहू सूचना पाठविण्यत येईल. |

९) **<u>श्री योगश सडमे, गाव-हेद्री, ता. एटापल्ली, जि. गडचिरोली:-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सर्वांनी आपापली मते मांडली, त्याचप्रमाणे माझेही मत मांडत आहे. परिसरातील बेरोजगारांना रोजगाराची संधी द्यावी. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की स्थानिकांना प्रकल्पात ९०% रोजगाराची संधि देण्यात येणार आहे. |
| २) | हेद्री गावातील रस्ते हे पूर्णपणे खराब झालेले आहेत. तरी त्या रस्त्यांची त्वरित दुरुस्ती करण्यात यावी | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ३) | आलदंडी येथील पूल बंद करण्यात आलेला आहेत.. भविष्यात तो पूल पडू शकतो. तर त्याचे नुतनीकरण करण्यात यावे | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| ४) | प्रकल्पात देण्यात यावी. आमच्या गावात इंग्रजी माध्यमाची शाळा, तसेच अत्याधुनिक हॉस्पिटल बांधण्यात यावेत. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की सर्व बाधित गावांच्यामधील केंद्र बिंदू (Centre Point) ठरवून तेथे हॉस्पिटल बांधण्यात येईल. त्याचप्रमाणे इंग्रजी माध्यमाची शाळा चालू करण्यात येईल. |

**१०) <u>श्री पंकज एक्का, राहणार-बांडे, ता. एटापल्ली, जि. गडचिरोली:-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आमच्या गावातील रस्त्यात पूर्णपणे खड्डे आहेत. गावासाठी चांगला रस्ता पाहिजे. रस्त्याच्या कडेची झाडे ही पूर्णपणे तुटलेली आहेत. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| २) | गावात कॉन्व्हेट शाळा आणि हॉस्पीटलची गरज आहे. तर ते उभारण्यात यावे. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की सर्व बाधित गावांच्यामधील केंद्र बिंदू (Centre Point) ठरवून तेथे हॉस्पिटल बांधण्यात येईल. त्याचप्रमाणे इंग्रजी माध्यमाची शाळा चालू करण्यात येईल. |
| ३) | बांडे गावातील पूल बांधलेला नाही. त्याची गरज आहे. रात्री-बेरात्री रुग्ण माणसाला घेऊन जाता येत नाही. तरी बांडे गावात पूल बांधण्यात यावा. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ४) | गावात पदवीधर खूप आहेत. त्यांना अजूनही रोजगार मिळालेला नाही. | प्रकल्पात स्थानिकांना ९०% रोजगाराची संधि देण्यात येईल. |

**११) <u>श्री मनोज तवांडे, राहणार-कुशापुरी, ता. एटापल्ली, जि. गडचिरोली:-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आमच्या ग्रामपंचायत हद्दीत बऱ्याच समस्या आहेत. आमच्या कुशापुरी ग्रामपंचायतीतील जास्तीत जास्त लोकांना प्रकल्पात रोजगार देण्यात यावा. कुशापुरी गावात नेहमीच वीज नसते. त्याचप्रमाणे गावात रस्ता चांगला नाही. तरी रस्त्याची दुरुस्ती करण्यात यावी. सर्वात महत्वाचे आहे शेती. तर शेतीत सोलर वीज आणि नळ ही सुविधा देण्यात यावी. | प्रकल्पात ९०% रोजगार हा बाधित ग्रामपंचायत क्षेत्रातील लोकांना देण्यात येईल. |

१२) <u>मिस सोनी सुरेश शेंडे, राहणार- पुरसलगुंडी, ता. एटापल्ली, जि. गडचिरोली:-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालकांनी महिलासुध्दा काम करु शकतात हा आत्मविश्वास दिला. ओरिसाला प्रशिक्षणासाठी पाठविले व आज आम्ही येथे सुरजागड प्रकल्पात काम करत आहोत. ज्या रस्त्यावरुन आम्ही गाडी चालवतो, तो रस्ता चांगला झाला पाहिजे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| २) | परिसरात शेतीवर लोक जगत होते. आताही जगतात, पण शेतात आता लाल पाणी आत शिरते. त्याचा बंदोबस्त करण्यात यावा. | त्यासाठी प्रकल्पात सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येईल |
| ३) | एटापल्ली तालुक्यात असणा-या अशिक्षित व शिक्षित युवक युवती आहेत, त्यांना प्रकल्पात रोजगाराची संधि मिळावी. | प्रकल्पात ९०% रोजगार हे स्थानिक युवक युवतींनाच देण्यात येतील. |
| ४) | त्याचप्रमाणे आमच्या गावात शाळा, इमर्जन्सी हॉस्पिटल पाहिजे. हे आदिवासीबहुल क्षेत्र असून वीज नसते, तर पाणीही वेळेवर मिळत नाही. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की सर्व बाधित गावांच्यामधील केंद्र बिंदू (Centre Point) ठरवून तेथे हॉस्पिटल बांधण्यात येईल. त्याचप्रमाणे इंग्रजी माध्यमाची शाळा चालू करण्यात येईल |

१३) <u>श्री रामजी गुड्डु, गाव-बांडे, ता. एटापल्ली, जि. गडचिरोली:-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आमच्या गावात रस्ता चांगला नाही. पूर्णपणे खड्डे पडलेला रस्ता आहे. त्याचप्रमाणे गावात चांगला दवाखाना नाही. गावातील युवक युवतींना रोजगाराची संधि प्रकल्पात मिळावी. त्याचप्रमाणात शेतात सर्वांना बोअरवेल सुविधा देण्यात यावी. | प्रकल्पातील ९०% रोजगार हे स्थानीक युवक-युवतींना देण्यात येतील. |

१४) **श्री रमेश विवानी, राहणार-मंगेर, ता. एटापल्ली, जि. गडचिरोली:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझे दोनच प्रश्न आहेत. खाणीतून होणा-या ध्वनि, वायू व धुळीच्या प्रदूषणाचे नियंत्रण व उपाययोजना सांगण्यात याव्यात, कंपनीने परिसरात प्रदूषणाचा त्रास न होण्यासाठी केलेल्या उपाययोजना याची माहिती द्यावी. | प्रकल्पात पर्यावरण व्यवस्थापन योजना (Environment Management Plan) त्वरित अंमलात आणण्यात येईल. |
| २) | खाणीच्या प्रकल्पासाठी जेवढी झाडे तोडण्यात आली, त्या परिसरातच त्या झाडांचे पुनर्रोपण करण्यात यावे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

१५) **श्री राकेश सडमे, ग्रामपंचायत-पुरसलगुंडी, ता. एटापल्ली, जि. गडचिरोली:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | येथील लोकांना महामंडळाच्या बसची जरुरी आहे. त्याचप्रमाणे स्थानिकांना एक मोबाईल टॉवरची आवश्यकता आहे. | सूचनांची नोंद घेण्यात आली. |

१६) **श्री सुभाष पंजाबराव टुपा, राहणार-मालमपाडा, ता. एटापल्ली, जि. गडचिरोली:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | त्यांनी हिंदीत सांगितले की माझा गाव खाणीपासून अंदाजे तीन कि.मी. दूर आहे. खाणीतून बाहेर येणार नाला माझ्या गावाजवळून जातो. त्यातून येणारी लाल माती ही आमच्या शेतात पूर्णपणे पसरलेली आहे. त्याचा बंदोबस्त हा कंपनीने करावा. | सूचनेची नोंद घेण्यात आली. प्रकल्पात पर्यावरण व्यवस्थापन योजना (ईएमपी) राबविण्यात येणार आहे. |
| २) | स्थानिकांनी मागणी केल्याप्रमाणे महाविद्यालय व दवाखाना आमच्या मलमपाडी गावातही त्वरित सुरु करण्यात यावे. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की सर्व बाधित गावांच्यामधील केंद्र बिंदू (Centre Point) ठरवून तेथे हॉस्पिटल बांधण्यात येईल. त्याचप्रमाणे |

| | | |
|---|---|---|
| | | इंग्रजी माध्यमाची शाळा चालू करण्यात येईल. त्याचप्रमाणे शाळाही बांधण्यात येईल. |
| ३) | हमारे गॉवके किसान जिनके पास गिनाचुना पट्टा है, और किसीके पास नही है तो उनको पट्टेका नियोजन कर दे! | सूचनेची नोंद घेण्यात यावी. |
| ४) | आमच्या गावात गेले तीन महिने वीज नाही. गेले दोन महिने एमएसईबी कार्यालयात चकरा मारून कंटाळलो आहोत. कोणीही समाधानकारक उत्तर देऊ शकलेले नाही. तर याचा बंदोबस्त कंपनीकडून केला असता तर बरे झाले असते. | सूचनेची नोद घेण्यात यावी, |
| ५) | आमच्या गावातील अतिक्रमण असो वा पट्ट्याची जागा असो,सोलर पंपाची सुविधा देण्यात यावी. हेद्रीपासून मलमपाडीपर्यंतचा रस्ता पूर्णपणे खराब आहे. तरी तो त्वरित दुरुस्त करण्यात यावा. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

**१७) श्री झुलसामाहा, राहणारा-मंगेरी, ता. एटापल्ली, जि. गडचिरोली:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीत जागा असूनही जागा रिक्त नाहीत असे सांगून स्थानिकांना रोजगाराची संधि देण्यात येत नाही. बाहेरच्या लोकांना रोजगार देतात, मग स्थानीकांना रोजगाराची संधि का देत नाहीत? सादरीकरणात दोन हजार लोकांना रोजगार मिळेल असे सांगितले. मात्र लेखी अहवालात तीन हजार असे लिहिलेले आहे. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की प्रकल्पात ९०% रोजगाराची स्थानिकांनाच देण्यात येणार आहे. |

**१८) मिस तारा मटाऊ, राहणार-पुरसलगुंडी, ता. एटापल्ली, जि. गडचिरोली:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझ्या गावात सिमेंट कॉक्रीट रस्ता पाहिजे, दवाखाना पाहिजे. माझ्या बरोबर आलेल्या मुली विचारतात की जर पुरुषांना | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | सेक्युरिटीमध्ये घेतात, तर स्त्रियांना का घेतले जात नाही? मलाही रोजगार पाहिजे. तरी आम्हांला सेक्युरिटी गार्डमध्ये रोजगार द्यावा ही विनंती. | |

१९) <u>मिस दीपाली दुलसामहा, राहणार-मंगेर, ता. एटापल्ली, जि. गडचिरोली:-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | रस्त्यावर जागोजागी खूप खड्डे असतात, त्यामुळे जाण्या-येण्याचा खूपच त्रास होतो. म्हणून चांगला रस्ता तयार करुन द्यावा. कंपनीत गेले ३० दिवस रोजगारासाठी जाते. पण अजून रोजगार मिळालेला नाही. रोजगार मिळण्यासाठी मी दोन दिवस डोंगरावर कामास गेलेली नाही. पण अजूनपर्यत मला कंपनीने उत्तर दिलेले नाही. मी स्थानिक असूनही मला रोजगार मिळत नाही. बाहेरच्या लोकांना कसे रोजगार मिळत आहेत? | प्रकल्पात ९०% रोजगार हा स्थानिक लोकांनाच देण्यात येणार आहे. |
| २) | सुरजागड प्रकल्पात महिलांना 80% रोजगार मिळावा. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ३) | आमच्या मंगेर गावात एक कॉनव्हेट शाळा येथील मुलांसाठी त्वरित चालू करण्यात यावी. मंगेरमध्ये एक अद्याधुनिक हॉस्पिटल पाहिजे | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की सर्व बाधित गावांच्यामधील केंद्र बिंदू (Center Point) ठरवून तेथे हॉस्पिटल बांधण्यात येईल. त्याचप्रमाणे इंग्रजी माध्यमाची शाळा चालू करण्यात येईल. त्याचप्रमाणे शाळाही बांधण्यात येईल. |

२०) <u>श्री रामयोगी विसुगोटा, राहणार-एकरापूर, ग्रामपंचायत तोडसा, ता. एटापल्ली, जि. गडचिरोली:-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आम्हांला रोजगार मिळावा. पिण्याच्या पाण्याची सुविधा पाहिजे. गावात हॉस्पिटल नाही, तर ते त्वरित बांधण्यात यावे. आमच्या | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | गावाजवळ एक नाला आहे. त्यावर पुल नाही. त्यामुळे जाताना खूप त्रास होतो. | |

२१) **श्री मधुकर कोंगाडी, राहणार-पुरसलगुंडी, ता. एटापल्ली, जि. गडचिरोली:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | येथे सर्वजण रोजगार मिळण्यासाठी प्रश्न विचारत आहेत. त्यांनी कंपनी व्यवस्थापनास प्रश्न विचारला की आपण ८०% स्थानिकांना रोजगार देण्याचे अभिवचन दिलेले आहे. तर आम्ही या प्रकल्पात ८०% स्थानिकांना रोजगाराची मागणी करत आहोत. तर कंपनी व्यवस्थापनाने यावर उत्तर द्यावे. येथे जिल्हाधिकारीसाहेब आहेत, शासकीय अधिकारी आहेत व स्थानिक लोक यांच्यासमोर उत्तर देण्यात यावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की रोजगाराची संधि स्थानिकांना निश्चितच उपलब्ध करुन देण्यात येतील. मात्र आम्हांला काही तांत्रिक गोष्टींचा विचार करावा लागतो. कंपनीत ऑपरेटर, ब्लास्टर इ. यांनी कौशल्य आवश्यक असते. त्यासाठी कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम हाती घेतलेला आहे. तो पूर्ण होण्यास वेळ लागू शकतो. आमच्याकडे रोजगार देण्याचे एक धोरण आहे,योजना आहे, ती अंमलात आणण्यात येईल. आम्ही शिकविण्याचे वर्ग सुरु केलेले आहेत. आम्हांला शंभर मायनिंग मेन बनवायचे आहेत. आम्ही तज्ज्ञ शिकविण्यास पाठवितो. मायनिंग असे क्षेत्र आहे की तेथे कोणतीही व्यक्ती ही निम्न पदावरुन अतिउच्च पदावर जाऊ शकते. दहावी पाससुध्दा जनरल मॅनेजरपर्यत जाऊ शकतो. तर आम्ही प्रत्येक स्टेजवर धोरण राबवन स्थानिकांनाच रोजगार देऊ. |
| २) | मी त्या भागातला एकमेव सिव्हिल इंजिनिअर आहे. ४-५ वेळा अर्ज देऊनही मला रोजगाराची संधि देण्यात आलेली नाही. मी २०१७ चा पास आऊट आहे. जर मला तेथे संधि मिळत नाही, तर इतरांचा काय? | प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की स्थानिक लोकांना प्राधान्य देणार म्हणजे स्थानीक लोकांनाच प्राधान्य मिळेल. आपला जो काही वैयक्तिक मुद्दा असेल, तर तो सकारात्मक दृष्ट्या सोडविण्यात येईल. |
| ३) | कंपनीकडे शेतकीबाबत काय नियोजन आहे? | प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की आपला प्रकल्प हा गट नं. ३४८.०९ हेक्टर येथेच राहिल. येथे काही लोकांनी आक्षेप नोंदविले की खाणीतून लाल पाणी येते. तर गढूळ पाणी येतच असते. पण आमच्या प्रकल्पातून येत असेल, तर तेथे सेटलींग प्रॉईट, गारलॅड बनवून त्यावर निश्चित सर्व प्रक्रिया करण्यात येईल. आमच्या प्रकल्पातून कोणतेही |

| | | |
|---|---|---|
| | | जल प्रदूषण होणार नाही, शेती खराब होणार नाही. त्याचप्रमाणे कोणाचेही विस्थापन होणार नाही. विस्तापन होण्याचा प्रश्नच येत नाही. |
| ४) | कंपनीने नियोजन न करता खाणकाम केलेले आहे. तर तेथे diversion केलेले नाही. नदीत पाणी जात आहे. आपल्या जिल्ह्यात सर्वात जास्त पाऊस पडतो. तर कंपनीने सर्व प्रश्न सोडवूनच पुढील विस्तारिकरण करण्यात यावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की आमचे सर्व मायनिंग उपक्रम प्रथम तांत्रिकदृष्ट्या अभ्यास करुनच शासनाच्या सर्व अधिसूचित परवानग्या, ना हरकत प्रमाणपत्र इ. प्राप्त झाल्यानंतरच कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत. |

२२) <u>**श्री अंकुश कवडू, राहणार-हेद्री, ता. एटापल्ली, जि. गडचिरोली:-**</u>

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | जिल्हा खनिज फंडात रॉयल्टीचे पैसे सुमारे ६० कोटी रुपये जमा आहेत. ते आमच्या ग्रामपंचायतीस गावाच्या विकासासाठी कधी वर्ग करण्यात येतील. | सूचनेची नोद घेण्यात आली. |

२३) <u>**श्री प्रशांत आत्राम, सरपंच, ग्रामपंचायत तोडसा, ता. एटापल्ली, जि. गडचिरोली:-**</u>

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | ग्रामपंचायत नागुलवाडी, तोडसा आणि परसलगुंडी या ग्रामपंचायत क्षेत्रातील जेवढ्या लोकांना रोजगार मिळाला, तर किती टक्के मिळाला हे प्रकल्प अधिकारी सांगतील. पण वरिल ग्रामपंचायत हद्दीत जे बेरोजगार आहेत, तरुण मुले, मुली आहेत, महिला आहेत, त्यांना विस्तारित प्रकल्पात प्राधान्याने रोजगाराची संधि देण्यात यावी. त्यामुळे त्यांना आर्थिक बळ प्राप्त होईल. ही मागणी मी कंपनी व्यवस्थापकांना करत आहे. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की आश्वासन दिल्याप्रमाणे कंपनीचे धोरण राबवून आम्ही निश्चितच रोजगाराची निर्मिती करु.<br>आमच्या कडे कार्यरत असलेल्या २००० अकुशल संवर्गातील व्यक्तींना कुशल बनवू. व्यक्ती जसे कौशल्य प्राप्त करेल, त्यानुसारच ती संख्या पाच हजारावर नेणार आहोत.<br>दुसरा मुद्दा हॉस्पिटलचा. तर प्रकल्पात २४ तास उपलब्ध असणारी वैदकीय सुविधा आहे. त्याचप्रमाणे २४ तास पॅरा-मेडिकल सेवा उपलब्ध आहे. आम्ही २४ तास रुग्णवाहिका उपलब्ध केलेली आहे. आता प्रत्येक गावात रुग्णवाहिका व अद्ययावत हॉस्पिटल बांधणे शक्य नाही. त्यासाठी |

| | | |
|---|---|---|
| | | सर्व गावाच्या हद्दीतील मध्य जागा (centre point) ठरवून त्याप्रमाणे रुग्णवाहिका व अद्ययावत हॉस्पिटल बांधण्यात येईल. त्याचप्रमाणे सर्व गावाच्या हद्दीतील मध्य जागा (centre point) ठरवून तेथे लोकांच्या मागणीनुसार शाळा बांधण्यात येईल. त्याबाबतचा प्रस्ताव शासनास पाठवून जशी मंजूरी मिळेल, त्यानुसार शाळा बांधण्यात येईल. लोकांची मागणी असेल, त्यानुसार शाळेचे माध्यम ठेवण्यात येईल. दुसरा विषय आहे गावातील आवश्यक सुविधा. बैठकीत सांगण्यात आले की काही गावात तीन महिने वीज नाही. त्याचा निश्चितच पाठपुरावा करण्यात येईल. दोन वर्षापूर्वी रस्त्यांवरुन चालता येत नव्हते. तर प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघातील रस्त्यांवरील खड्डे हे त्वरित कंपनीकडून बुजविण्यात येतील.<br>त्याचप्रमाणे गावकऱ्यांनी मागणी केल्यानुसार नाल्यावरील पूल, नदीवरील पूल (बांदे नदीवरील पूल) बांधण्याबाबत शासनाकडे पाठपुरावा करण्यात येईल. जर पूलाची डागडुजी करावयाची असल्यास त्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल. |

२४) **श्री दयालु इकजुर, गाव-दयालकुंजी, ता. एटापल्ली, जि. गडचिरोली:-**

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | गावात खूप लोक आहेत, ते पूर्वी काम करत होते, आता करु शकत नाहीत. तर त्यांनी दरमहा दोन हजार रुपयांचे पेन्शन मिळणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे एटापल्लीत जे मोठे हॉस्पिटल तयार होत आहे, ते हेदरीत झाले असते तर बरे झाले असते. | प्रकल्प प्रवर्तक यांनी माहिती दिली का हेदरीमध्ये हॉस्पिटल बांधण्याचा आमचा प्रस्ताव आहे. कमीतकमी तेथे डे केअर हॉस्पिटल निश्चितच बनवू. |

२५) **श्री अरुणा मधुकर साळवे, सरपंच, ग्रामपंचायत पुरसलगुंडी, ता. एटापल्ली, जि. गडचिरोली:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | जी जनतेची मागणी आहे, तीच माझी मागणी आहे. मी आक्षेप नोंदविला होता की जेथे खाण/खदान आहे, तेथेच जनसुनावणी ही आयोजित करण्यात यावी. आता ती जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आलेली आहे. माझ्या ग्रामपंचायतील सामान्य जनता ही सूचना, आक्षेप नोंदविण्यास आलेले आहेत. त्यांना बाहेर ठेवण्यात आलेले आहे. त्यांना मत देण्याची संधी देण्यात यावी व त्याची नोंद घेण्यात यावी. यापुढे जेथे प्रकल्प आहे, तेथेच जनसुनावणी आजोजित करण्यात यावी. | महाराष्ट्र शासनाने बाधित क्षेत्राची मर्यादा प्रकल्प स्थानाच्या ५.० कि.मी. परीघापर्यंत दिनांक २९ सप्टेंबर, २०१९ च्या अधिसूचनेनुसार घोषित केलेली आहे. म्हणजे प्रकल्पाच्या ५.० कि.मी. परिघातच जनसुनावणी घ्यावी लागेल. मात्र कायदा व सुव्यवस्थेबाबत काही प्रश्न, समस्या उद्भवण्याची शक्यता असल्यास दुस-या जागी घेऊ शकत. त्यावेळी एटापल्लीचा विचारही करण्यात आलेला नव्हता. मात्र सर्व आदेश, वृत्तपत्रातील पर्यावरणविषयक जाहिर सूचना प्रकाशित झाल्यानंतर काही जणांनी एटापल्लीविषयी आग्रह धरला. |

२६) **श्री अजय मारुती साळवे, सदस्य, ग्रामपंचायत-पुरसलगुंडी, ता. एटापल्ली, जि. गडचिरोली:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | पलसरगुंडी गावापासून ४-५ कि.मी. अंतरावर आलेंगा, एडलगोंदी, आलूर ही गावे आहेत. येथे नाला आहे. रस्ता नाही. गेले ७-८ महिने जाणे-येणे बंदच आहे. तरी त्या नाल्यावर पूल पाहिजे. गावात रस्तासुध्दा नाही. वीज नाही. ही सुविधा पुरविण्यात याव्यात. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| २) | सुरजागड देवस्थान आहे. मंदिरापर्यंत जाण्या-येण्याची सुविधा करावी. त्याचप्रमाणे प्रकल्पात जे अशिक्षित आहेत, त्यांना पण तोच रोजगार व जे शिकलेले-पदवीधर आहेत, त्यांनासुध्दा तोच रोजगार देण्यात येतो. गडचिरोली जिल्ह्यात सर्वात जास्त आदिवासी | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | आहेत, तर एक आदिवासी भवन बांधण्यात यावे. | |

२७) **श्री मधुकर सडमे, सदस्य, ग्रामपंचायत-पुरसलगुंडी, ता. एटापल्ली, जि. गडचिरोली:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | ही खदान जेथे आहे, त्या फुलसरगोंदी ग्रामपंचातयत हद्दीत ही जनसुनावणी आयोजित करणे आवश्यक होते. पलसरगुंडी नाही तर एटापल्ली किंवा हेडीला जनसुनावणी होणे गरजेचे होते. तेथे बैठक घेतली असती तर बरेच लोक आले असते व त्यांनी त्यांचे सूचना, आक्षेप नोंदविले असते. | महाराष्ट्र शासनाने बाधित क्षेत्राची मर्यादा प्रकल्प स्थानाच्या ५.० कि.मी. परीघापर्यंत दिनांक २९ सप्टेंबर, २०१९ च्या अधिसूचनेनुसार घोषित केलेली आहे. म्हणजे प्रकल्पाच्या ५.० कि.मी. परिघातच जनसुनावणी घ्यावी लागेल. मात्र कायदा व सुव्यवस्थेबाबत काही प्रश्न, समस्या उद्भवण्याची शक्यता असल्यास दुस-या जागी घेऊ शकतात. त्यावेळी एटापल्लीचा विचारही करण्यात आलेला नव्हता. मात्र सर्व आदेश, वृत्तपत्रातील पर्यावरणविषयक जाहिर सूचना प्रकाशित झाल्यानंतर काही जणांनी एटापल्लीविषयी आग्रह धरला. |

२८) **श्री सुधाकर, राहणार-झारेवाडा, ता. एटापल्ली, जि. गडचिरोली:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आमचे झारेवाडा गाव हा तीन कि.मी, अंतरावर आहे. जे वंचित आहेत, गावात जे शिकलेले व अशिक्षित आहेत, त्यांना रोजगाराची संधि मिळाली पाहिजे. आमच्या गावात दवाखाना झाला पाहिजे. सादरीकरणात सांगितल्याप्रमाणे कौशल्यविकास कार्यक्रम हा चांगल्याप्रकारे राबविला पाहिजे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| २) | मी गेल्या २० वर्षांपासून ६५ गावात पुण्याची एक एनजीओ संस्था बाएएफ, त्यात आदिवासी विकासासाठी मी काम करतो. तर | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | या प्रकल्पात स्थानिकांना प्रशिक्षण देऊन चांगली नोकरी देणे गरजेचे आहे. | |

२९) **<u>श्री अजय कंकडलवार, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष, ता. जि. गडचिरोली:-</u>**

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | ही जनसुनावणी ही इटापल्ली तालुक्यात किंवा जेथे प्रकल्प होणार आहे, तेथे होणे नियमानुसार योग्य होते. कारण त्या गावातून व तालुक्यातून सामान्य माणूस येथे येऊ शकत नाही. जनसुनावणी म्हणजे जनतेचे विचार, सूचना किंवा आक्षेप प्रशासनाने ऐकून समजून घेणे. काही लोक आले, त्यांनी पोलिस प्रशासनाने आत येऊ दिले नाही. तर काही लोक गाड्या करुन आले. तर माझी मागणी आहे की ही जनसुनावणी इटापल्लीला किंवा जेथे प्रकल्प आहे,तेथे घेण्यात यावी. | महाराष्ट्र शासनाने बाधित क्षेत्राची मर्यादा प्रकल्प स्थानाच्या ५.० कि.मी. परीघापर्यंत दिनांक २९ सप्टेंबर, २०१९ च्या अधिसूचनेनुसार घोषित केलेली आहे. म्हणजे प्रकल्पाच्या ५.० कि.मी. परिघातच जनसुनावणी घ्यावी लागेल. मात्र कायदा व सुव्यवस्थेबाबत काही प्रश्न, समस्या उद्भवण्याची शक्यता असल्यास दुस-या जागी घेऊ शकतात. त्यावेळी एटापल्लीचा विचारही करण्यात आलेला नव्हता. मात्र सर्व आदेश, वृत्तपत्रातील पर्यावरणविषयक जाहिर सूचना प्रकाशित झाल्यानंतर काही जणांनी एटापल्लीविषयी आग्रह धरला. |
| २) | माझी मागणी आहे की गेले २-३ वर्षापासून हा प्रकल्प चालू आहे. त्यात स्थानिक बेरोजगारांना रोजगाराची संधि देण्यात येत नाही. सादरीकरणात जे दर्शविण्यात आलेले आहे, त्याचे पालन होत नाही. येथे शिकलेले स्थानिक कंपनीत नसतील, तर स्थानिकांना त्या प्रकल्पाचा काहीही उपयोग नाही. सुरक्षारक्षक १०-१२ हजारावर काम करतात, त्यांना काय भविष्य आहे?जर कार्यरत प्रकल्पात स्थानिकांना रोजगाराची संधि देत नाही, तर विस्तारिकरण प्रकल्पात देतील हे संशयास्पद वाटते. | प्रकल्पात स्थानिकांना ९०% रोजगाराची संधि देण्यात येते. |
| ३) | लोह काढताना जे डस्ट उडते, ती रस्त्यावर पसरते. त्यामुळे तेथील लोकांचे, जनावरांचे आरोग्य धोक्यात आहे. त्यासाठी कोणतीही पर्यायी व्यवस्था नाही. डस्टमुळे शेजारी | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | वाहणारे पाणी हे पूर्णपणे लाल होते. तेथील पाणी मुके जनावरेही पीत नाहीत. | |
| ४) | स्थानिक जनतेला विश्वासात घेणे आवश्यक आहे. रोजगार देताना नैसर्गिक साधनसंपत्ती नष्ट होता कामा नये. येथील तेंदू सिझन महत्वाचा आहे. जर हे नष्ट झाले, तर येणा-या पिढीस काहीच राहणार नाही. आम्ही रोजगार देण्याच्याविरुध्द नाही. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ५) | प्रकल्पात आवश्यक असणारे प्रशिक्षण स्थानिक तरुण-तरुणींना आगाऊ देऊन नंतर त्यांना रोजगाराची संधि या प्रकल्पात द्यायला पाहिजे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ६) | त्याचप्रमाणे प्रकल्पामुळे जंगल,मुके जनावरे नष्ट झाली नाही पाहिजे. पैसा येथे महत्वाचा नाही. पर्यावरण महत्वाचे आहे. येथील पर्यावरण, नागरिकांचे जीवनमान यासाठी प्रशासनाने लक्ष दिले पाहिजे. रस्त्यावर ट्रक्स उभी राहतात, त्यामुळे रुग्णवाहिकेला जायलासुध्दा जागा जात नाही. येथे प्रशासनाने लक्ष देणे गरजेचे आहे. तरी ही जनसुनावणी ही इटापल्ली तालुक्यात किंवा तेथील ग्रामपंचायत हद्दीत परत घेण्याची मागणी करतो. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

**३०) श्री अंकुश गावडे, राहणार-मोरली, ता. एटापल्ली, जि. गडचिरोली:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | जनसुनावणी ही तेरा गावांतील बाधित लोकांसाठी आहे की बाहेरच्या लोकांसाठी आहे. जर बाधित लोकांसाठी आहे तर आम्ही बोलणार. ७५ वर्षे स्वातंत्र्याला झाली, पण आमच्या गावात हॉस्पिटल नाही, वीज नाही. जर आता विकास होणार आहे, तर ती थांबली नाही पाहिजे. आजपर्यंत आम्हांला कोणी खुर्चीवर बसून भडाकावले किंवा कोणी बंदुक | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | घेऊन भडकावले. तर ते होई नये ही विनंती. येथील स्थानिकांना त्यांचा विकास करायचा आहे. | |

३१) <u>श्री दीपक मल्लाजी आत्राम, माजी आमदार, ता. आलापल्ली, जि. गडचिरोली:-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | २००७ साली लॉईडला उत्खनन करुन कॅपटिव्ह पध्दतीने रोजगार निर्माण करण्याची परवानगी देण्यात आली होती. सदरहू पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात जाहिर सूचना म.प.नि.मंडळाने प्रकशित केलेली होती, त्यानुसार प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले. त्यानुसार आदिवासी संघटनेच्या माध्यामातून मी माजी लोकप्रतिनिधी म्हणून आक्षेप नोंदविलेला होता की नियमाप्रमाणे प्रकल्प स्थानावर पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करणे आवश्यक आहे, पण काही प्रशासकीय कारणांमुळे होत नसेल तर इटापल्ली तालुक्याच्या जागी ही जनसुनावणी आयोजित करणे आवश्यक आहे. | महाराष्ट्र शासनाने बाधित क्षेत्राची मर्यादा प्रकल्प स्थानाच्या ५.० कि.मी. परीघापर्यंत दिनांक २९ सप्टेंबर, २०१९ च्या अधिसूचनेनुसार घोषित केलेली आहे. म्हणजे प्रकल्पाच्या ५.० कि.मी. परिघातच जनसुनावणी घ्यावी लागेल. मात्र कायदा व सुव्यवस्थेबाबत काही प्रश्न, समस्या उद्भवण्याची शक्यता असल्यास दुसऱ्या जागी घेऊ शकतात. त्यावेळी एटापल्लीचा विचारही करण्यात आलेला नव्हता. मात्र सर्व आदेश, वृत्तपत्रातील पर्यावरणविषयक जाहिर सूचना प्रकाशित झाल्यानंतर काही जणांनी एटापल्लीविषयी आग्रह धरला. |
| २) | तेथील सुशिक्षित तसेच अशिक्षित लोकांमध्ये भिती आहे की आपली शेती जाईल काय, गावे विस्थापित होतील का आणि त्यांना त्याबाबत जिल्हाधिकारी यांनी तसे होणार नाही हा शब्द दिला तर त्या लोकांना हिम्मत येईल. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ३) | प्रकल्प स्थापन होत असताना शासन आणि प्रशासन हे वेगळे सांगतात आणि ३-४ वर्षांनी वेगळा परिणाम परिसरातील लोकांना दिसतो. त्यांनी सिरोंचा तालुक्यातील एका प्रकल्पाविषयी माहिती सांगितली. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| ४) | विस्तारिकरण प्रकल्पात किती लोकांना रोजगाराची संधि मिळणार आहे? एटापल्ली तालुक्यातील किती लोकांना प्रकल्पात समावेश करणार? प्रकल्पातील रोजगाराच्या संख्येत ५०% लोक एटापल्ली तालुक्यातील घेणार काय? सूरजागड येथे ३-४ वर्षे झाली, पण तेथे ना स्पॉंज आयर्न प्लँट सुरु केला, ना प्रोसेसिंग प्लँट चालू केलेला आहे? स्पॉंज आयर्न प्रकल्पात किती लोक नोकरीस लागतील? ९०% लोक बाधित क्षेत्रातील कंपनीत घेणार का? प्रोसेसिंग प्लॅट चालू केला तर त्यात ९०% लोक बाधित क्षेत्रातील कंपनीत घेणार का? प्रकल्प विस्तारिकरणामुळे धुळीचे प्रमाण वाढणार असून त्यामुळे परिसरात विविध आजार वाढू शकतात. त्यासाठी एटापल्ली गावात आपण Multi-Speciality Hospital उघडणार आहात काय? Integrated Steel Plant मध्ये स्थानिकांना प्रशिक्षण देऊन रोजगाराची संधि देणार आहात काय? त्याभागात ठाकूरदेव म्हणून खूप मोठे देवस्थान आहे. तेथे ४-५ तालुक्याचेच नाही, तर छत्तिसगडहूनही लोक येतात. तर त्याचे पुनर्वसन कसे करणार? तरी प्रकल्पात स्थानिकांना रोजगाराची सधि देण्यात यावी, | प्रकल्पात 90% लोक हे स्थानिक असतील. |
| ५) | या प्रकल्पात तेरा गावातील सुशिक्षित युवक-युवतींना प्रशिक्षण देऊन रोजगार देण्यात यावा, ज्या मूलभूत सोयी (पिण्याचे पाणी, अत्याधुनिक वैदकीय सेवा, शिक्षणाची सोय) करण्यात यावी. त्याचप्रमाणे इटापल्ली तालुक्यातील सर्व गावांना विकासाच्या या कार्यात समावेश करुन घ्यावे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

३२) <u>डॉ. देवराव होळी, आमदार, गडचिरोली विधानसभा क्षेत्र, गडचिरोली:-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | बैठकीत बाधित होणाऱ्या तेरा गावाच्या लोकांनी, स्थानिकांनी सूचना,आक्षेप नोंदविले. त्यात सर्वांनी एक मुद्दा मांडला की रोजगाराची संधि देण्यात यावी. कोणीही प्रकल्पाला विरोध केलेला नाही. त्यामुळे गडचिरोली लोकप्रतिनिधी म्हणून अभिनंदन. सूरजागडमध्ये उत्खनन होईल व कोनसरीमध्ये स्टील प्रकल्प होणार. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| २) | कोनसरी गावातील लोकांनी प्रकल्पाला जमिन दिली. अजून तीनशे एकरपेक्षा जास्त जमिन जाणार आहे. तेसुध्दा प्रकल्पबाधित आहेत. तर सूरजागड, कोनसरी,एटापल्ली तालुका येथील सर्व बाधितांसाठी, जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक समन्वयक समिती त्वरित गठित करण्यात यावी. त्यास आवश्यक असल्यास जिल्ह्याचे पालकमंत्री उप-मुख्यमंत्री यांची मान्यता घेण्यात येईल. | सूचनेची नोंद घेण्यात आली |
| २) | तेरा गावातील बाधित कुंटुबातील एका व्यक्तीस प्रकल्पात कायमस्वरुपी रोजगाराची संधि त्याच्या शैक्षणिक गुणवत्तेनुसार, त्या बाधित कुटुंबातील जो अशिक्षित आहे त्यास रोजंदारीवर नोकरी देण्यात यावी. | सूचनेची नोद घेण्यात आली. |
| ३) | तेरा गावातील १० कि.मी. परिघातील लोकांच्या समस्या, कोनसरी गावाच्या १० कि.मी. परिघातील लोकांच्या समस्या सोडविण्यासाठी त्या समितीने कार्य करावे. प्रकल्पातून लाल पाणी येते, प्रकल्पातील डस्ट, त्याचा परिसरातील व इतर भागातील लोकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम न होण्यासाठी उपाययोजना यासाठी ही समिती काम करेल. | सूचनेची नोंद घेण्यात आली |

**३३) श्री. राजे धर्मरावबाबा आत्राम, आमदार-अहेरी विधानसभा क्षेत्र तथा माजी मंत्री:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | येथे २२ गावे-तीन ग्रामपंचायत बाधित होत आहेत. बैठकीत प्रकल्पाला कोणीही विरोध केलेला नाही. रोजगार निर्मिती प्रकल्पामुळे झाली. मात्र अधिकाहुन अधिक लोकांना काम मिळाले पाहिजे. त्यात महिलांनाही रोजगार देण्याची मागणी झालेली आहे. जर महिलांना ५०% आरक्षण दिलेले आहे, तर कंपनीने महिलांनाही रोजगाराची संधि दिली पाहिजे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| २) | बैठकीत सर्व लोकांनी प्रत्येक गावात दवाखाना बांधण्याची मागणी केली. त्यासाठी सर्व गावाच्या मध्यावर एक Centre Super Speciality Hospital उभारणे आवश्यक आहे. लोकांना वैदकीय सुविधा चांगल्या व त्वरित मिळणे गरजेचे आहे. | सुचविलेल्या सूचनेप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल. |
| ३) | त्याचप्रमाणे येथे मागणी झाली की प्रत्येक गावात एक इंग्रजी माध्यमाची शाळा हवी. तर त्यासाठी कंपनीने प्रयत्न केलेच पाहिजे. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की सर्व बाधित गावांच्यामधील केंद्र बिंदू (Centre Point) ठरवून तेथे हॉस्पिटल बांधण्यात येईल. त्याचप्रमाणे इंग्रजी माध्यमाची शाळा चालू करण्यात येईल. त्याचप्रमाणे शाळाही बांधण्यात येईल. |
| ४) | येथील गावातील रस्त्यांसाठी कंपनीने मदत करावी अशी सर्वांनी मागणी केलेली आहे. प्रकल्प विस्तारिकरणामुळे वाहतुकीत वाढ होईल. त्यासाठी रस्ते चांगले राहणे आवश्यक आहे. जवळजवळ दोन हजार जास्त वाहने वाढतील. एम्बुल्नसला जागा मिळत नाही. त्यासाठी कंपनीने वाहतुक व्यवस्था (Traffic Management) चोख ठेवली पाहिजे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ५) | साठी वर्षे झाली, पण आदिवासी जो राबतो, त्याल पट्टा मिळाला नाही, त्याबाबत पुढील कार्यवाही. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ६) | मायनिंग निधि साठ कोटी रुपये आहे. तो ग्रामविकास कामाला खर्च करावा. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | शेतकऱ्यांना शेतात सोलर पंप देण्यात यावे.त्यासाठी कंपनीने पुढाकार घ्यावा. | |
| ६) | लोकांचा प्रकल्पाला विरोध नाही. मात्र त्यांना शैक्षणिक, वैदकीय सुविधा, तरुण-तरुणींना प्रशिक्षण, रोजगाराची संधि व इतर सुविधा मिळाल्या पाहिजे. | सूचनेची नोंद घेण्यात यावी. |

**३४) <u>श्री रमेश गजबे, आमदार, आरमोरी विधानसभा क्षेत्र:-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | बेरोजगारांना रोजगार मिळण्यासाठी ह्या प्रकल्पाचे विस्तारिकरण आवश्यक आहे. मात्र आता आधुनिक तंत्रज्ञान या प्रकल्पात आलेले असून याच्यापेक्षाही मोठा प्रकल्पाचा विस्तार झाला, तर ते जिल्याच्या दृष्टीने चांगले आहे, कारण रिकाम्या हातांना काम देता येईल. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| २) | बैठकीत लोकप्रतिनिधींनी येथील स्थानिकांच्या व प्रकल्प प्रवर्तकांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी दक्षता समितीची आवश्यकता मांडली. त्यास माझा पाठिंबा आहे. कारण प्रत्येक माणूस काही कंपनीकडे जाऊ शकत नाही. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ३) | येथे नियोजनासाठी सीईआर निधी आहे. त्यांनी २.४८ कोटी राखीव ठेवल्याचे सांगितले. तर याच्यात वाढ करावी लागेल. त्यामुळे इतर पर्यावरणीय योजना हाती घेता येतील. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ४) | जल,जमीन,जंगल, वायू आणि ध्वनी यांच्या प्रदूषणाच्या नियंत्रणासाठी उपाययोजना आवश्यक आहेत. येथील स्थानिकांनी धुळीच्या प्रदूषणामुळे होणारा त्रास येथे सांगितलाच आहे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ५) | तेरा गावांचा विषय आहे, तर माझी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, कंपनी यांना विनंती आहे जिल्ह्यामध्ये | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | चांगलाच प्रकल्प होत आहे. त्यास आमची मान्यता राहिल. पण प्रथम तेरा गावातील लोकांचा रोजगारी साठी विचार व्हावा, नंतर जिल्ह्याचा व माझ्या आरमोरी विधानसभा मतदारसंघाचा विचार व्हावा. जिल्ह्यात आय.टी.आय झालेले बरेच विद्यार्थी, विद्यार्थिनी असतील, त्यांना रोजगार दिल्यास त्याच्या कुटुंबाला स्थैर्य लाभेल. | |
| ६) | प्रकल्पासाठी ५,००० किलोवॅट वीज लागणार आहे. तरी विस्तारिकरणाबरोबरच वीजनिर्मिती प्रकल्प टाकला, तर आपल्या शेतकरी बांधवाना कृषि पंपासाठी वीज उपलब्ध होईल व सर्व परिसर सुजलाम, सुफलाम होईल. त्यामुळे शेतकऱ्यांना एक जोडधंदा मिळेल. तरी ह्या विस्तारिकरणासह कंपनी चालू राहावी आणि जिल्ह्यातील बेरोजगारांना काम मिळावे एवढीच माझी इच्छा आहे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

**३५) श्री अशोक नेते, खासदार, चिमुर-गडचिरोली लोकसभा मतदारसंघ:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या जनसुनावणीत बाधित तेरा गावातील ग्रामपंचायत सरपंच व उपस्थित नागरिक यांनी आपली मागणी या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीस ठेवलेली आहे. येथे कोणीही प्रकल्पास विरोध केलेला नाही. सर्व लोकप्रतिनिधींनीसुध्दा सदरहू प्रकल्पास पाठिंबा दिलेला आहे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| २) | आपल्या जिल्ह्यात लोहखनिज, हिरा,बरेच मिनरल्स, मँगेनिज आहे, विशेष म्हणजे सोनेसुध्दा आहे. तर विस्तारिकरणानंतर तेरा गावातील लोकांना सुविधा पुरविणे हे कंपनीचेच काम आहे. विस्तारिकरणामुळे कंपनीत रोजगार निर्मितीत निश्चितच वाढ | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | होणार आहे. तर उपस्थितांनी मागणी केली की स्थानिकांनाच रोजगार मिळाला पाहिजे. या मागणीस माझाही पाठिंबा आहे. महिलांनीही मागणी केली की त्यांनाही रोजगाराची संधी द्यावी. त्यांचाही अधिकार आहे. | |
| ३) | येथील उपस्थित सर्व लोकप्रतिनिधींनी मागणी केली की या प्रकल्पाच्या विस्तारिकरणामुळे होणाऱ्या संभाव्य परिणामांवर उपाययोजना करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक समन्वयक समिती गठित करण्यात यावी. यास माझाही पाठिंबा आहे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ४) | त्याचप्रमाणे कंपनीने येथे कौशल्य विकास प्रशिक्षण संस्था (Skill Development Training Council) स्थापन करावी. त्यात सर्व कोर्सेस उपलब्ध करण्यात यावेत. येथील कष्टाळू तरुण-तरुणी फक्त सूरजागड, जिल्ह्यात,राज्यातच नाही,तर देशात, परदेशात नांव कमवू शकतो. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ५) | याठिकाणी कंपनी Integrated Processing Steel Plant स्थापन करणे कंपनीचा मानस आहे. ते त्यांनी करावे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगाराची निर्मिती होईल. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ६) | तरी माझ्या दोन मागण्या कंपनीकडे आहेत -<br>अ) कौशल्य विकास प्रशिक्षण संस्था (Skill Development Training Council) स्थापन करावी,<br>आ) Integrated Processing Steel Plant स्थापना करावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ७) | येथे धुळीच्या त्रासामुळे व्यापा-यांनी आंदोलन केलेले आहे. आता उप-मुख्यमंत्री आणि पालक मंत्री, गडचिरोली यांनी मायनिग कॉरिड़ॉरची घोषणा केलेली आहे. त्यामुळे धुळीचा त्रास होणार नाही, कारण सर्व ट्रक्स हे कॉरिडॉमधूनच जातील. व्यापारी लोकांना बायपासची मागणी केली, जिल्हाधिकारी यांनी | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | प्रस्तावसुध्दा तसा पाठवविला. पण बायपासची आवश्यकता पडणार नाही. | |
| ८) | कंपनीने तेरा गावातील व स्थानिकाच्या मागण्यांची पूर्तता करावी व त्याचप्रमाणे पर्यावरण व्यवस्थापन योजना (Environment Management Plan-EMP) पूर्णपणे अंमलात आणावी. त्याचप्रमाणे शासनाने सामाजिक समस्यांकडे लक्ष घालावे, कारण जिल्हाधिकारी हे शासनाचे प्रतिनिधी आहेत. शासनाकडे मायनिंग फंड मोठ्या प्रमाणात जमा होतो. तो गावातील विकासासाठी खर्च करण्यात यावा. कंपनीस सीएसआर हा २% खर्च करावा लागतो. खूप लोकांनी सांगितले की शेतात लाल पाणी येत आहे.त्याबाबत नियोजन करण्यात यावे. याबाबत एक वेगळा बँक करावा का यासाठी नियोजन करणे आवश्यक आहे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

**३६) <u>श्री संजय मीणा, भाप्रसे, जिल्हाधिकारी, जि. गडचिरोली:-</u>**

श्री संजय मीना, **भाप्रसे**, जिल्हाधिकारी,गडचिरोली जिल्हा यांनी सांगितले की काही प्रश्नांची उत्तरे ते स्वत: देत आहेत. त्यांनी सांगितले की सदरहू उत्तरे हे हिंदीतून देत आहेत, कारण प्रकल्प प्रवर्तक ह्यांनी मराठी कळत नाही, ते बाहेरुन आलेले आहेत आणि सदरहू अहवाल नवी दिल्लीला पाठविणार असल्याने तेथे भाषांतराचा मुद्दा येऊ नये.

- पहिला मुद्दा विचारण्यात आला की सदरहू जनसुनावणी ही एटापल्ली येथे का आयोजित करण्यात आली नाही, तर जिल्हाधिकारी कार्यालयात का घेण्यात आली?

\- महाराष्ट्र शासनाने बाधित क्षेत्राची मर्यादा प्रकल्प स्थानाच्या ५.० कि.मी. परीघापर्यंत दिनांक २९ सप्टेंबर, २०१९ च्या अधिसूचनेनुसार घोषित केलेली आहे. म्हणजे प्रकल्पाच्या ५.० कि.मी. परिघातच जनसुनावणी घ्यावी लागेल. मात्र कायदा व सुव्यवस्थेबाबत काही प्रश्न, समस्या उद्भवण्याची शक्यता असल्यास दुसऱ्या जागी घेऊ शकतात. त्यावेळी एटापल्लीचा विचारही करण्यात आलेला नव्हता. मात्र सर्व आदेश, वृत्तपत्रातील पर्यावरणविषयक जाहिर सूचना प्रकाशित झाल्यानंतर काही जणांनी एटापल्लीविषयी आग्रह धरला.

- मुद्दा - २ जिल्हाधिकारी कार्यालयातच का आयोजित करण्यात आली.

\- येथे ३०-३५ लोक कुठल्याही दडपणाशिवाय निर्भयेतेने आपले विचार, सूचना किंवा आक्षेप नोंदवू शकले.

* जिल्हा मायनिंग फंडाविषयी बैठकीत विचारणा व गावातील विकास कामांसाठी खर्च करण्याची सूचना करण्यात आली.

- २९ सप्टेंबर पर्यंत रुपये ७,४३,००,०००/- (रुपये सात कोटी त्रेचाळीस लाख) पर्यंतच्या कामांना मंजूरी मिळालेली आहे. हेद्री सोलर लाईट्स, आशा वर्कर, बाधित क्षेत्रासाठी सायकल वाटप इ. कामांना मंजूरी मिळाली. जिल्हा मायनिंग फंड (डी.एम.एफ.) हा ६०% बाधित क्षेत्रात, तर ४०% अबाधित क्षेत्रात खर्च करण्याचे आदेश आहेत. तरी डी.एम.एफ. बाबत चिंता करु नये. अजून डीएमएफची अंमलबजावणी समिती गठित झालेली नाही. त्यासाठी पालक मंत्री, गडचिरोली जिल्हा यांना विनंती करण्यात येईल.

* महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मे. लॉयड्स मेटल्स एण्ड एनर्जी लिमेटेड यांच्या सूरजगड आयर्न ओर खाण प्रकल्पाच्या उत्पादन क्षमता विस्तारिकरण ३.० दशलक्ष प्रति वर्षे ते १०.० दशलक्ष प्रति वर्षे करण्याबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली होती. त्यासाठी तेरा गावातील लोकांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आलेले होते. आमची अशी इच्छा होती की प्रौढ व्यक्ती जे मतदार आहेत, त्यांची येथे गरज होती. त्याचप्रमाणे विकासाबाबतचे मुद्दे हे खासदार, आमदार, माजी आमदार, जिल्हा परिषद अध्यक्ष यांनी बैठकीत उपस्थित केलेले आहेत.

* बरेच मुद्दे हे सामाईक मुद्दे (कॉमन पॉईन्टस) होते उदा. प्रकल्पात रोजगार, दवाखाना, शाळा, रस्ते, पूल. तर डी.एम.एफ. अंतर्गत जेवढ करणे शक्य आहे, तेवढे करण्यात येईल.

मी येथे सर्व लोकप्रतिनिधी - खासदार, आमदार यांना विनंती करतो की त्यांनी त्याच्या विकासकामे आवश्यकता त्वरित कळवावी, म्हणजे आम्हांला ती कामे पूर्ण करणे शक्य होईल.

आदिवासी निवासी शाळा ही कंपनीने सुरु केली तरच ती होऊ शकते. शासनाची आदिवासी निवासी शाळा हे एकलव्य मॉडेल स्कूल आहे. चार आदिवासी निवासी शाळा मंजूर झालेल्या असून एक भामरागड आणि एटापल्ली येथे मंजूर झालेले आहे. तेथे जमिनीबाबत निर्णय झाल्यानंतर तेथे आदिवासी निवासी शाळा सुरु होतील. एक आदिवासी निवासी शाळा असून ते वनविभागाच्या मुद्यांवरुन प्रलंबित आहे.

- राष्ट्रीय महामार्ग (National Highway) चा मुद्दा उपस्थित करण्यात आला. आष्टी ते एटापल्ली रोडबाबत चर्चा झाली. तर आष्टी ते लगाम रस्ता मोठा करता येत नाही, कारण तो वन्यजजीव अभयारण्यातून जातो. वन्यजीव अभयारण्य (Wild Life Sanctuary) येथून साडेपाच मीटर्सचा बी.टी. रस्त्यास मंजूरी मिळालेली असून त्याचे कामही सुरु झालेले आहे. लगाम ते एटापल्ली ते सिरोंचा या रस्त्याच्या कामाचे टेंडरींग झालेले आहे. मुद्दा असा की आताचा चढ (चढाई) साडेपाच मीटर आहे आणि तो बनवायचा आहे १० मीटरपेक्षा जास्त. त्यासाठी वन खात्याची परवानगी घ्यावी लागते. त्यानंतर पुढील कार्यवाही. शासनाकडून आपल्याला ब-याच गोष्टींची अपेक्षा आहे. मात्र माझी येथे नियुक्ती झाल्यापासून सकारात्मक गोष्टी करण्याचा आमचा प्रयत्न असतो.

- खूप लोकांना माहित आहे की आम्ही ग्रामसभेबरोबर काम करत आहोत. लोकांना माहित आहे की आम्ही रेल्वे प्रकल्पासाठी जमिन अधिग्रहित करणार आहोत. लोकांना माहित आहे की आम्ही गोंडवाना विद्यापीठासाठीही काम करत आहोत. याबाबत कोणाला अजूनही माहिती हवी असल्यास त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, ते शेजारी आहे. आपल्या सर्वांचा एकच प्रश्न आहे की आज कोणत्या योजना आहेत ते आपल्याला माहित नाही. जनता ही जिल्हाधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय, तलाठी कार्यालय येथे जात नाही. त्यासाठी शासन आपल्या दारी (Government at Door Step) ज्याचे नांव आहे Citizen Benefit Distribution System. बैठकीत लोकप्रतिनिधींनी मुद्दा उपस्थित केला की वनहक्क पट्टे मिळावेत. निश्चितच मिळाले पाहिजे. फक्त वनहक्क पट्टेच का, दोनशे सेवा आहेत त्या मिळाल्याच पाहिजेत. लोकांना कृषि प्रमाणपत्र, डोमेसाईल प्रमाणपत्र इ.
- तर यासाठी तहसीलदार स्तरावर आम्ही एक सर्वेक्षण करणार आहोत. आता येथे सुमारे १२ ते सव्वा बारा लाख लोक आहेत. त्यांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे की त्यांच्याकडे कोणती योजना पोचलेली नाही. सर्वेक्षण झाल्यानंतर अनुमान काढण्यात येईल की त्यांनी कुठली योजना लागू करता येईल. त्यासाठी वेळ लागू शकतो.
- काही लोकांनी बैठकीत मोबाईल टॉवरची मागणी केली. तर त्यास उत्तर देण्यात येते की जिओतर्फे १००, बीएसएनएल, एअर टेल यांच्याकडून बरेच मोबाईल टॉवर विशेषतः पूर्व गडचिरोलीसाठी मंजूर झालेले आहेत. त्यासाठी जागा लागते. वेगवेगळ्या टॉवरची अलगअलग गरजा असतात. जियो ४,००० स्वेअर फीट, बीएसएनएल २,५०० स्वेअर फीट तर एअरटेल ४०० स्वेअर फीट जागा मागत आहे. तर ज्या व्यक्तींना खाजगी जमीन किंवा ग्रामपंचायतीस त्यांचे जमिन जर भाड्याने देण्यास तयार असेल तर त्यांनी त्याबाबत तहसीलदार यांच्याकडे रितसर अर्ज करा.
- याशिवाय काही आवश्यकता असेल किंवा पर्यावरणा संबंधी जो काही निर्णय घेईल, ते प्रशासनास अवगत करण्यात यावे. ते आम्ही ग्रामसभेस अवगत करु शकू. संपर्कासाठी मोबाईल व इंटरनेट आवश्यक आहेच. त्याचप्रमाणे ज्या काही छोट्या गोष्टी आहेत, त्या उपल्ब्ध करण्यास प्रशासन कटिबध्द आहे.
- पुढील २-३ वर्षात बऱ्याच सोयीसुविधा उपलब्ध होतील उदा. रस्ते, रेल्वे, गोंडवाना विद्यापीठ. मोबाईल टॉवर्स.
- तर आपणास विनंती आहे की आपण प्रशासनास सहकार्य करावे.

बैठकीच्या गोषवारा घेताना प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की श्री दीपकभाऊ आत्राम यांनी चांगले मुद्दे मांडले. त्यांनी उपस्थित केलेले मुद्दे हे प्रकल्प प्रवर्तकांनी सकारात्मक घेतलेले आहेत. त्यांचा मुद्दा आहे की स्थानिकांना रोजगार. तर कोनसरी प्रकल्पात ९०% स्थानिकांना रोजगार देणार आहोत.

त्यांनी दुसरा मुद्दा विचारला प्रोसेसिंग प्रकल्प. प्रकल्प अधिकारी यांनी उत्तर दिले की आम्ही ८.० मिलियन टनाचा Integrated Steel Plant हा कोनसरीला लावत आहोत. आता कुठलाही प्रकल्प सुरु करावयाच्या असल्यास त्याच्या बऱ्याच लिगल प्रोसेस आहे. त्यामुळे असा प्रकल्प एटापल्ली जवळ शक्य होणार नाही. भविष्यात त्याचा निश्चितच विचार करण्यात येईल.

प्रकल्पबाधित जे लोक आहेत, त्यांनाच प्राधान्य देण्यात येईल.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी जिल्हाधिकारा गडचिरोली, जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी, तेरा गावातील सर्व उपस्थित बंधूभगिनी, प्रकल्पाचे अधिकारी, म.प्र.नि. मंडळ अधिकारी व कर्मचारी, पत्रकार या सर्वाचे आभार मानले. त्यांनी सांगितले की बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येईल. तेथील तज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. सदरहू इतिवृत्ताची व व्हिडिओ ग्राफीची प्रत मागणी केल्यास स्थानिकांना उपलब्ध करुन देण्यात येईल

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीतील सर्व स्थानिक जनता, प्रकल्पग्रस्त, शासकीय अधिकारी व कर्मचारी, पोलिस यंत्रणा, प्रकल्पाचे सर्व व्यवस्थापन यांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्ष यांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

प्राप्त झालेले ३७ सूचना,आक्षेप सोबत जोडलेले आहेत.

**(अतुल सातफळे)**
समन्वयक, पर्यावरणविषयक
जाहिर जनसुनावणी समिती तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर

**(अ. मा. करे)**
सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती तथा
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर

**(धनाजी पाटील)**
अध्यक्ष, पर्यावरणविषयक
जाहिर जनसुनावणी समिती
तथा अपर जिल्हादंडाधिकारी,
गडचिरोली